# केंद्र सरकारच्या जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे स्वागत

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशात जातीनिहाय जनगणना करण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे समाजाच्या विकासासाठी सखोल धोरण ठरविण्यास मदत होणार असून सामाजिक न्यायाचा नवा अध्याय सुरु होईल, विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय ऐतिहासिक आहे. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला हे वृत्त येऊन थडकले. एकाअर्थी ही मोदी सरकारची सामाजिक न्यायाची भेट देशाला मिळाली आहे. या जनगणनेमुळे दूध का दूध, पानी का पानी होईल. आणि या देशाचे वस्त्र नेमक्या कुठल्या धाग्यांनी विणले आहे हे स्पष्ट होईल, असे शिंदे यांनी म्हटले आहे.

जातनिहाय जनगणनेचा निर्णय म्हणजे सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने टाकलेले महत्वपूर्ण, क्रांतीकारी पाऊल आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. जातनिहाय जनगणना होत नसल्याने अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती वगळता अन्य जातींच्या लोकसंख्येच्या आर्थिक, सामाजिक स्थितीची माहिती उपलब्ध होत नव्हती. याचा फटका ओबीसी समाज बांधवांसह इतरही समाजघटकांना बसत होता. जातनिहाय जनगणनेच्या निर्णयामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना योग्य समाजघटकांपर्यंत पोहचण्यास मदत होईल. यातून सर्व समाजांना विकासाची समान संधी उपलब्ध होईल, असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत जातनिहाय जनगणनेला मान्यता देण्यात आली असून लवकरच देशात जातनिहाय जनगणना होणार आहे. मी या निर्णयाचे सहर्ष स्वागत करतो. गेल्या अनेक वर्षांपासून जातनिहाय जनगणना व्हावी यासाठी आम्ही मागणी करत होतो. जातनिहाय जनगणनेमुळे आपल्या देशातील समतेचा विचार आणखीन दृढ होईल. असे पाटील यांनी म्हटले आहे.

दरम्यान, केंद्र सरकारचा जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय फसवा असून या माध्यमातून जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. सरकारने अद्याप जनगणना कधी करणार? याबाबत कोणताही स्पष्ट खुलासा केलेला नाही. उलट सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, जातीय जनगणना करणे शक्य नाही. यामुळे केंद्र सरकारची भूमिका दुटप्पी आणि दिशाभूल करणारी आहे असा आरोप त्यांनी लगावला आहे.

# कीर्तन हे भगवंत नामस्मरणाचे प्रभावी साधन– महंत रामगिरी



**शिरसगाव (वार्ताहर)–** कीर्तनांमधून चांगल्या गोष्टी आत्मसात कराव्यात. बाहेरील काहीही श्रवण करण्यापेक्षा परमार्थ, कथा व किर्तनासाठी वेळ द्यावा, किर्तनात हरिभक्ती व्यक्त होत नसेल तर ते कीर्तन व्यर्थ आहे. कीर्तन हे भगवंत प्राप्तीचे साधन असल्याचा उपदेश श्रीक्षेत्र गोदाधाम सरला बेटचे मठाधिपती रामगिरी महाराज यांनी केला.

तालुक्यातील उंदीरगाव येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता महंत रामगिरी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. त्यावेळी उपस्थित भाविकांनी उपदेश करताना ते बोलत होते. अशोक साखर कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश गलांडे यांनी सन १९९० पासून तालुक्यातील अनेक भाविकांना भारतभर तीर्थयात्रा घडविल्या. तसेच आलेल्या निधीतून गावातील मंदिरांचा विकास केला. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली, त्यामुळे उंदिरगावच्या विकासामध्ये त्यांचे मोठे योगदान असल्याचे महाराजांनी सांगितले. उंदीरगाव येथे २१ ते २८ एप्रिल या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात डॉ.वैष्णवानंद महाराज गर्जे (मुंबई), भगीरथ महाराज काळे (आळंदी), दादासाहेब महाराज रंजाळे (निमगाव खैरी), स्वामी विश्वनाथगिरी महाराज (चोर वाघलगाव), कांचनताई जगताप (नासिक), भागवताचार्य अशोक महाराज इलग (बोधेगाव), विनोदाचार्य पांडुरंग महाराज (वावीकर) यांची किर्तने झाली. सोमवारी महंत रामगिरी महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने या उत्सवाची सांगता झाली. किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन सुनील गुंड यांनी केले. यावेळी माजी चेअरमन सुरेश गलांडे, राजेंद्र पाऊलबुद्धे, संचालक वीरेश गलांडे, जितेंद्र गोलवड, अशोक गुळवे, अशोक गलांडे, शिवाजी आढाव, गेनू भालदंड, बाळासाहेब आढाव, सुभाष बोधक आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेवासा फाटा येथे मुस्लिम बांधवांकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध

**नेवासा फाटा (प्रतिनिधी)–** जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा मुस्लिम बांधवांच्या वतीने नेवासा फाटा येथील मदिना मस्जिद येथे तीव्र निषेध करण्यात आला. या हल्ल्यामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या बांधवांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी मौलाना जुनेद यांनी सांगितले की, इस्लाम धर्मामध्ये कोणाचीही हत्या करण्याचा अधिकार सांगितलेला नाही. ते मोठे पाप आहे, ज्यांनी हे कृत्य केले त्यांना कठोरात कठोर शिक्षा करावी, जेणेकरून पुन्हा असा हल्ला करण्याची कोणाची हिम्मत होणार नाही. धर्माधर्मामध्ये तेढ निर्माण करणारी अतिरेकी शक्तीचा सरकारने नायनाट करावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. यावेळी ज्येष्ठ नागरिक शरीफ भाई, निजाम शेख, रहीम शेख, माजी होमगार्ड हमीदभाई शेख, सुलेमान मामू, इकबाल खान, कबीरभाई शेख यांच्यासह मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# बेलापूरच्या जि. प. शाळेतील विद्यार्थिनींचे विविध स्पर्धा परीक्षांत यश

**बेलापूर–** येथील जि. प. प्राथमिक मुलींच्या शाळेत शालेय उपक्रमांच्या आयोजनाबरोबर विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते.

यावर्षीही मंथन प्रज्ञाशोध, महात्मा फुले प्रज्ञाशोध व लक्ष्यवेध परीक्षांमध्ये शाळेतील मुलींनी सहभाग घेतला होता. यामध्ये कु. भक्ती अशोक निमसे (इयत्ता दुसरी) व कु काव्या सोमनाथ नवगिरे (इयत्ता दुसरी) या दोन्ही विद्यार्थिनी मंथन प्रज्ञाशोध, महात्मा फुले प्रज्ञाशोध परीक्षा व लक्ष्यवेध या तीनही परीक्षांच्या गुणवत्ता यादीत झळकल्या. कु. नव्या स्वप्नील ठाकरे (इयत्ता दुसरी) ही विद्यार्थिनी महात्मा फुले प्रज्ञाशोध परीक्षा, कु. इकरा सिकंदर शेख (इयत्ता तिसरी) ही विद्यार्थिनी मंथन प्रज्ञाशोध परीक्षा तर कु अलिना वाजीद शेख (इयत्ता चौथी), कु. साईशा अनिल मोकाशी (इयत्ता चौथी) या महात्मा फुले प्रज्ञाशोध परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकल्या. या यशाबद्दल त्यांचे वर्गशिक्षिका श्रीमती शितल गायकवाड, विजया दहिवाळ, लता परदेशी आणि सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बनसोडे, सौ. प्रयागा निमसे यांनी अभिनंदन केले. तसेच गावातील शिक्षणप्रेमी ग्रामस्थ आणि पालकवर्ग यांनी कौतुक केले.

# तुकाराम महाराजांच्या पालखीचे १८ जूनला पंढरपूरकडे प्रस्थान

**पुणे (प्रतिनिधी)–** जगत्गुरू संत शिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून १८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पायी पालखी सोहळा ६ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. यंदा पालखी सोहळ्याचे ३४० वे वर्ष आहे. याबाबतची माहिती देहू संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी दिली. ६ ते १० जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे.

पालखी सोहळ्यात तिथीचा क्षय झाल्याने अंथुर्णे येथील मुक्काम रद्द केला आहे. यंदा पालखी लोणी काळभोरपासून पुढे गेल्यानंतर दुपारच्या १ तासाच्या विश्रांतीसाठी शिंदवणे चौकात थांबणार आहे. २१ जुलैला पालखी देहूत दाखल होणार आहे. पालखीचे प्रस्थान १८ जून रोजी होणार असून पहिला मुक्काम येथील इनामदार वाड्यात होईल. १९ जून रोजी पालखी इनामदार वाड्यातून बाहेर पडल्यानंतर पहिल्या अभंग आरतीसाठी अनगडशहा बाबा दर्गाजवळ थांबेल तर दुसऱ्या अभंग आरतीसाठी पालखी चिंचोली येथील पादुका मंदिरात थांबेल आणि संध्याकाळी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात दुसऱ्या मुक्कामासाठी थांबेल. २० आणि २१ जून रोजी पालखी पुण्यात नानपेठेतील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल, पालखी याच मंदिरात मुक्कामी असेल. २२ जून रोजी पालखी पुण्यातून लोणी काळभोर कदम वाकवस्ती पालखीतळाकडे रवाना होईल व येथेच पालखी नव्या पालखी तळावर मुक्कामी राहिली. २३ जून रोजी यवत येथील भैरवनाथ मंदिर पालखी तळावर मुक्कामी असेल. २४ जून रोजी वरवंड येथील विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल.

२५ जूनला पालखी उंडवडी गवळ्याची येथे मुक्कामी असेल. २६ जूनला पालखी बारामती शारदा विद्यालयाच्या प्रांगमात मुक्कामी असेल. २७ जूनला सणसर येथे मुक्कामी असेल. २८ जूनला पालखी सणसर मधुल पहाटे निघेल व वाटेत बेलवडी येथे पहिले (गोल रिंगण) करेल व पालखी रात्री निमगाव केतकी येथे पालखी तळावर मुक्कामासाठी जाईल. २९ जूनला पालखीचे इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण होईल व रात्री पालखी इंदापूर येथे मुक्कामी असेल, ३० जूनला पालखी सराटी येथे मुक्कामी असेल. १ जुलै रोजी सकाळी संत तुकाराम महाराजांच्या पादुकांना सराटी येथे निरा स्नान घालुन पुढे पालखी अकलुज कडे मार्गस्थ होईल व येथे दुपारी तिसरे गोल रिंगण पुर्ण करेल. त्यानंतर पालखी अकलुजच्या माने विद्यालयाच्या प्रांगणामध्ये मुक्कामासाठी रवाना होईल. २ जुलैला पालखी अकलुज वरून सकाळी निघेल व दुपारी पालखी मार्गावरील माळीनगर येथे पहिले उभे रिंगण होईल. त्यानंतर पालखी रात्री बोरगाव येथील पालखी तळावर मुक्कामी राहिल.

३ जुलैला तोंडले बोंडले येथे धावा करून पालखी पिराची कुरोली येथे मुक्कामासाठी रवाना होईल. ४ जुलैला पालखीचे सायंकाळी बाजीराव विहिर येथे दुसरे उभे रिंगण पार पाडेल व त्यानंतर पालखी वाखरी येथील पालखी तळावर मुक्कामी राहिल. ५ जुलै रोजी पालखी सकाळी वाखरी येथून पंढरपूर कडे रवाना होईल व सायंकाळी पादुका आरतीस्थळी पालखी सोहळ्यातील शेवटचे व तिसरे उभे रिंगण पार पडेल. त्यानतंर पालखी सायंकाळी श्री क्षेत्र पंढरपूर शहरात प्रवेश करेल आणि रात्री पालखी येथील श्री संत तुकाराम महाराज मंदिर नवीन इमारतीमध्ये विसावेल. येथे पालखी रविवारी ६ जुलै ते गुरूवार १० जुलैअखेर मुक्कामी असेल. १० जुलैला पालखी सोहळा दुपार नंतर देहूकडे परतीच्या प्रवासाला सुरवात करेल. हा १२ दिवसांचा परतीचा प्रवास संपवून हा सोहळा श्री क्षेत्र देहूगाव येथे २१ जुलैला दुपारी पोहचेल व येथे मंदिरात पालखी सोहळ्याची सांगता होईल.

भाविकांची सोय व्हावी, दिंडी चालकांना मुक्कामाच्या ठिकाणी लवकरात लवकर पोहचता यावे यासाठी शहरी भागात सायंकाळी ८ वाजता समाज आरती घेण्यात येणार असून त्यानंतर लगेच किर्तन सुरू करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष मोरे यांनी सांगितले. यंदा पालखी सोहळ्यात तिथीचा क्षय झाल्याने आंथुर्णे येथील मुक्काम रद्द करण्यात आला आहे. जर तिथी वाढली असती तर इंदापूरला दोन मुक्काम झाले असते अशी माहिती पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी दिली. लोणी काळभोर वरून पालखी सोहळा निघाल्यानंतर उरुळी कांचन मार्गे पुढे जात असतो. हा पालखी सोहळा पुर्वी पासुन गावातून जात असे. सध्या पालखी सोहळा गावातून बाहेर पडण्यास तीन ते चार तास लागतात. याचा विचार करून व गत वर्षी उद्भवलेल्या परिस्थितीनुसार यंदा येथील ग्रामस्थांशी चर्चा करून व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या विनंती अर्जानुसार पालखी सोहळा दुपारच्या एक तासाच्या विसाव्यासाठी शिंदवणे येथील पीडीसीसी बॅंकेसमोर थांबणार असल्याचे पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी सांगितले.

**देहू संस्थानचे पालखी सोहळा प्रमुख जाहीर**

संत तुकाराम महाराजांच्या ३४० व्या पालखी सोहळ्यासाठी श्री संत तुकाराम संस्थानच्या वतीने गणेश महाराज मोरे, वैभव महाराज मोरे, दिलीप महाराज मोरे यांची पालखी सोहळा प्रमुख म्हणून घोषणा संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी केली.

## पान १ वरुन

### केंद्र सरकार जातनिहाय जनगणना करणार

घेतलेली आहे. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करावी, अशी मागणीही त्यांनी याआधी अनेकदा केलेली आहे. असे असतानाच आता केंद्राने जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे.

### उसाच्या एफआरपीमध्ये प्रति क्विंटल १५ रुपयांची वाढ

३५५ रुपये प्रति क्विंटल एफआरपी उत्पादन खर्चापेक्षा १०५.२% ने जास्त आहे. २०२५-२६ च्या साखर हंगामासाठीचा एफआरपी चालू साखर हंगाम २०२४-२५ पेक्षा ४.४१% जास्त आहे. मंजूर केलेला एफआरपी २०२५-२६ च्या साखर हंगामात (१ ऑक्टोबर २०२५ पासून) साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करण्यासाठी लागू असेल.

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना फायदा होण्याची अपेक्षा आहे. तथापि, यामुळे साखर कारखान्यांचा उत्पादन खर्चही वाढू शकतो, ज्यामुळे बाजारात साखरेच्या किमतीवर परिणाम होऊ शकतो.दरम्यान, साखर कारखाने वाढलेल्या ऑपरेशनल आणि खरेदी खर्चाचे कारण देत साखरेचा किमान विक्री दर (एमएसपी) वाढवण्याची सरकारकडे मागणी करत आहेत.

### तासिका तत्वावर नेमलेल्या शिक्षकांच्या मानधनात वाढ

नसलेल्या शिक्षकांची घड्याळी तासिका तत्त्वावर नियुक्ती करण्यात येऊ नये. तसेच घड्याळी शिक्षकांची मानधन नियमितपणे अदा करण्यात येईल याची शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांनी दक्षता घ्यावी, असे शिक्षण विभागामार्फत सांगण्यात आले आहे.

दरम्यान, राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून एखाद्या विषयासाठी अर्धवेळ शिक्षकांसाठी आवश्यक असलेला कार्यभार उपलब्ध होऊ शकत नसेल तर अशा विषयाच्या अध्यापनासाठी अर्हता प्राप्त व्यक्तीची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात येते. त्यांना घड्याळी तासिकेनुसार मानधन देण्यात येते.

### लाडक्या बहिणींसाठी २५११ कोटी रुपये वितरीत करण्यास मान्यता

महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहित महिलेला तिच्या स्वतःच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे दरमहा रु.१,५००/- इतकी रक्कम देण्यात येते.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेच्या मागणी नुसार रु.२८२९.०० कोटी इतक्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून रु. २५११.०० कोटी (अक्षरी रु. दोन हजार पाचशे अकरा कोटी फक्त) इतका निधी पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे अदा करण्याच्या अनुषंगाने वितरीत करण्यास मान्यता दिली आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय उच्च न्यायालयाने फेटाळला

गल्लीत अडकून पडल्याचे कर्जत नगरपंचायतीत दिसत आहे. पदाचा आणि सत्तेचा कसा गैरवापर केला जातो हे जनता उघड्या डोळ्यांनी बघत आहे. आजचा न्यायालयाचा निर्णय योग्य आणि लोकशाहीला बळकट करणारा आहे. हा निर्णय दोन दिवस आधी आला असता, तर आमच्या उमेदवार प्रतिभा भैलुमे या नगराध्यक्ष झाल्या असत्या. भैलुमे यांचा अर्ज मागे घेण्यामागेही गटनेता बदलण्यास नकार देणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाचेच परिणाम दिसून आले. याबाबत आ. पवार यांनी न्यायालयीन निर्णय उशिरा मिळाल्याचा खेद व्यक्त केला.

दरम्यान, उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक लवकरच होणार असून या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. गटनेता बदलण्याचा निर्णय घेण्याअगोदर ही निवडणूक घेणे म्हणजे प्रशासनाने पुन्हा एकदा सत्ताधाऱ्यांच्या बाजूने भूमिका घेतल्याचा आरोप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या घडामोडींमुळे कर्जत नगरपंचायतीतील सत्तासंघर्ष आणखी गडद झाला असून राजकीय वातावरण तापले आहे. आता गटनेतेपदावर जिल्हाधिकाऱ्यांचा अंतिम निर्णय आणि त्यानंतर होणाऱ्या निवडणुका कर्जतच्या राजकारणाची दिशा ठरवतील.

### गोदावरी नदीतील प्रदूषण कमी करण्याच्या कामाला वेग येणार

बदल विभागाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नमामि गंगेच्या धर्तीवर व्यापक कृती आराखडा राबवण्याच्या अनुषंगाने सांडपाणी प्रक्रिया सुधारणा, औद्योगिक सांडपाणी नियंत्रण, कचरा व्यवस्थापन सुधारणा व अन्य अनुषंगिक उपाययोजनांचा समावेश करून याबाबतचा कृती आराखडा शासनास सादर करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सादर केलेल्या नमामि गोदावरी कृती आराखड्यास मान्यता देऊन सदर कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याकरीता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था / प्राधिकरणे यांना कालबध्द कृती कार्यक्रम तयार करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

त्या अनुषंगाने गोदावरी नदी कृती आराखडा अंमलबजावणीकरीता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था / प्राधिकरणे यांना पाठविण्यास मान्यता देण्यात आली आहे. कृती आराखडा अंमलबजावणी यंत्रणा सदर कृती आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित शासकीय विभाग, शासन यंत्रणा शासकीय मंडळे व गोदावरी नदीकाठावर असलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सदर कृती आराखड्यामध्ये समाविष्ट सांडपाणी प्रक्रिया सुधारणा, औद्योगिक सांडपाणी नियंत्रण, कचरा व्यवस्थापन सुधारणा व अन्य अनुषंगिक उपाययोजनांची

अंमलबजावणी विहित कालावधीमध्ये करणे बंधनकारक राहील. सदर आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गोदावरी नदीकाठावरील सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व आवश्यकतेनुसार संबंधित शासन यंत्रणा शासकीय मंडळे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम पाहतील. सर्व संबंधित शासकीय विभाग, मंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सदर विहित कृती आराखड्याची कार्यक्षम अंमलबजावणी सुनिश्चित करावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

### मनोज जरांगेंचे पुन्हा 'चलो मुंबई'

कोणतंही पाऊल उचलणार नाही. ऑगस्ट महिन्यात कोणतही काम राहत नाही. आता आम्ही मुंबईत गेल्यानंतर आरक्षण घेईपर्यंत माघारी फिरणार नाही, असे म्हणत २८ ऑगस्टला मला मुंबईत सोडण्यासाठी या असे आवाहन मनोज जरांगेंनी मराठा बांधवांना केले आहे.

याबाबत पुढे बोलताना मनोज जरांगेंनी सांगितलं की, मुंबईत आणि अंतरवालीत एकाच वेळी उपोषण सुरू होणार आहे. फडणवीस यांना माझ्यावर हल्ला करायचा असेल तर मी तुमच्या दारात २९ ऑगस्टला येत आहे काय करायचं असेल ते करा. मुंबईत माझ्या मुलांना काही झालं तर सरकारमधील आमदार खासदारांना घराबाहेर निघू देणार नाही. २८ ऑगस्टच्या आत सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी करा अन्यथा २९ ऑगस्टला अंतरवाली-मुंबईत एकाच वेळी आंदोलन सुरू करणार

तसेच सरकारने आपली १०० टक्के फसवणूक केली. सरकारने तिन्हीही गॅझेटीयर लागू केले नाही. संस्थांच्या नोंदी घेतलेल्या नाही. सगे सोयरे अंमलबजावणी केली नाही, मराठा कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढला नाही. मराठा कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढण्यासाठी ५८ लाख पुरावे खूप झाले, असे म्हणत मी मुंबईत जाताना विजयाचा किंवा अंत्ययात्रेचा रथ घेऊनच जाणार.. असे विधानही जरांगेंनी यावेळी केले.

### पद्मश्री विखे पाटील कारखान्याच्या चौकशीला सामोरे जाण्याची...

ठेवल्याने सदरचा गुन्हा दाखल झाला आहे. कोणतीही चौकशी ही गुन्हा दाखल झाल्याशिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे या गुन्ह्याच्या आधारे पुन्हा याच प्रकरणात नव्याने होणाऱ्या चौकशीला सामोरे जाण्याची कारखाना व्यवस्थापनाची तयारी आहे. मार्च २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेल्या आदेशात कारखाना व्यवस्थापन व इतरांच्या विरोधात त्रास होईल अशी कोणतीही जबरदस्तीची कारवाई करु नये असा स्पष्ट आदेश दिलेला असल्याने या प्रकरणातील सर्वच स्पष्टता आता समोर आलेली असल्याचे ना. विखे पाटील म्हणाले.

शिर्डी विधानसभा मतदार संघातील जनतेने सलग आठ वेळा चांगल्या मताधिक्याने मला निवडून दिले आहे. जनतेचा विश्वास कामातून मी सार्थ ठरविला असल्याचे ना. विखे पाटील म्हणाले. विधानसभा निवडणूकीत जिल्ह्यात महायुतीला मिळालेले यशही मोठे आहे. अनेकांना ते देखवत नाही. त्यामुळेच व्यक्तिव्देशापोटी मला बदनाम करण्यासाठी विरोधक केवीलवाणा प्रयत्न करतात. असे प्रयत्न यापुर्वीही अनेकवेळा झाले परंतू जनतेने त्यांना थारा दिलेला नाही. आत्ता सुध्दा कारखान्याच्या माध्यमातून बदनामी करण्याचाच प्रयत्न आहे पण यात त्यांना यश मिळणार नाही. निवडणूक आली की, वातावरण निर्माण करायचे आणि वैफल्यापोटी आरोप करायचे, ही आमच्या विरोधकांची सवय आहे. यामध्ये ते स्वतःची पत घालून बसले आहेत. या सर्व प्रकरणात त्यांचा बोलविता धनी कोण आहे हे सांगण्याची आता आवश्यकता नाही. कारखान्याच्या बाबतीत एवढीच कळकळ त्यांना होती तर, निवडणूकीत सभासदांना सामोरे का गेले नाहीत. सद्यस्थितीत त्यांनी उकरुन काढलेल्या प्रकरणातील योजनेचे ते लाभार्थीही नाहीत जनतेचा विश्वास त्यांनी केव्हाच गमविला आहे, अशी टिका ना. विखे पाटील यांनी केली.

### अकोलेतील उडदावणे होणार 'मधाचे गाव'

अक्षरी रुपये पाच कोटी, एक लाख, सत्याण्णव हजार मात्र) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास अटींच्या अधिन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

योजना कार्यान्वित झाल्यानंतर पुढील वर्षांसाठी योजना कार्यान्वीत रहावी याची संपूर्ण जबाबदारी संबंधित गावावर राहील, याबाबतचे हमीपत्र संबंधित ग्रामपंचायतीकडून घेण्यात येणार आहे. ज्या गावांमध्ये शासनाने मंजूर केलेल्या निधीपेक्षा जास्त खर्चाची आवश्यकता भासेल, तो खर्च अन्य योजनेअंतर्गत असलेल्या निधीमधून उपलब्ध करुन देण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना राहील. मधपेट्यांसाठी लागणारी १० टक्के रक्कम लाभार्थ्यांना द्यावी लागणार आहे. ९० टक्के रक्कम सरकार देणार आहे.

### जिल्ह्यातील ४४ गावांतील पिण्याचे पाणी दूषित

जिल्ह्यात ४४ गावातील पिण्याच्या पाण्याचे नमुने दूषित आढळल्याची घटना उल्लेखनीय असल्याचे मानले जाते. गेल्या १ मार्च २०२४ पासून ३१ मार्च २०२५ या वर्षभराच्या कालावधीत ४८८ पाणी नमुने दूषित आढळल्याची माहिती आरोग्य विभागाकडून उपलब्ध झाली. जामखेड व कोपरगाव तालुक्यात एकाही गावचे पाणी नमुने दूषित आढळले नाही. इतर सर्व तालुक्यात पाणी नमुने दूषित आढळले. आरोग्य विभागाकडून दरमहा दोन वेळेला बायोमेट्रिक पध्दतीने व एकवेळेला रासायनिक पध्दतीने पाणी नमुने तपासले जातात. नमुने दूषित आढळल्यास संबंधित बीडीओ, ग्रामपंचायतीला कळवले जाते. त्यानुसार पाणी प्रक्रियेवर देखरेख ठेवून पुन्हा पाणी नमुने तपासले जातात.

राजुरमध्ये ८ एप्रिलला पाणी नमुने तपासण्यात आले, ते योग्य आढळले. मात्र २३ एप्रिलला प्रथम काविळीची साथ पसरल्याचे निदर्शनास आले. त्याचा जिल्हा परिषदेचे यंत्रणांनी शोध घेतला असता, राजुरजवळ यात्रा भरली होती, त्याच दरम्यान भंडारदऱ्याचे आवर्तन सुटले होते. यात्रेसाठी मोठी गर्दी झाली होती. गावची पाणीयोजना 'एमजीपी'ने तयार केली. ती अद्याप ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झालेली नाही. या योजनेची शुध्दीकरण यंत्रणा बंद होती. त्याचा परिणाम काविळीची साथ पसरण्यात झाला असावा असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या. शुध्दीकरण यंत्रणा कार्यान्वित करून दोन दिवस राजुरचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. त्यानंतर परिसरातील गावांतील पाण्याचे नमुनेही तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.